-:जाहीर नोटीस:-

राज्य शासनाच्या सिंचन व इतर प्रकल्पांसाठी खाजगी क्षेत्रातील जमीन, खाजगी वाटाघाटी व्दारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याचे अनुषंगाने महसुल व वन विभाग, मंत्रालय मुंबई, शासन निर्णय दिनांक १२-०५-२०१५ व ३०-०९-२०१५ अवये मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यांत आलेली आहेत.तसेच शासन परिपत्रक क्र.एलक्युएन-०१/२०१७/ अ-२ दिनांक. २५/०१/२०१७ अवये खाजगी क्षेत्रातील जमीन, खाजगी वाटाघाटी व्दारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याचे अनुषंगाने कार्यपध्दती विशद केलेली असून त्याचे (२)(ब) (एक) अन्वये प्रस्तावाची जाहीर सूचना खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| प्रस्तावाचे ांव | भूसंपादन प्रकरण क्रमांक ५४/२०१२-१३,मौजे मुरादपूर(उर्वरित).ता.चिखली येथील जमिनीचे खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने ०४ भूधारकांचे क्षेत्र ००.३६ हे.आर. ताब्यात घेणे. |
| भूसंपादन अधिकारी | उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी बुलडाणा. |
| यंत्रणा | कार्यकारी अभियंता,खडकपूर्णा प्रकल्प,देऊळगांवराजा. |
| यंत्रणा उपविभाग | उपविभागीय अभियंता ,खडकपूर्णा प्रकल्प उपविभाग क्र.३ टाकरखेड भागिले. |
| संपादनाचे प्रयोजन | मोजे मुरादपूर येथील खडकपूर्णा प्रकल्प उपसा सिंचन योजना टप्पा क्र.४ मुख्य कालव्यावरील थेट लघुपाट क्र.३ च्या बांधकामसाठी. |

भूसंपादन प्रकरण क्रमांक ५४/२०१२-१३,मौजे मुरादपूर(उर्वरित).ता.चिखली येथील खाजगी वाटाघाटी व्दारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घ्यावयाच्या जमिनीचा गोषवारा.

| अ.क्र. | भूधारकांचे नांव | गट नं. | संपादीत क्षेत्र | वन झाडे,फळझाडे, विहीर, बांधकाम इत्यादी. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | सौ.शोभा विजय गाडेकर व इतर | १२३ | ००.०७ | -- |
| २ | आमोल सुखदेव घाडगे अपाक.आई अंजनाबाई व ८ | १२६ | ००.१० | बोर-१ |
| ३ | सुलोचना प्रताप गाडेकर | १२५ | ००.०८ | --- |
| ४ | गजानन एकनाथ गाडेकर | १२२ | ००.११ | -- |
| एकूण | | | ००.३६ | |

करीता उपरोक्त नमूद जमिनी बाबत हया जाहिर नोटीस व्दारे कळविण्यांत येत आहे की,

०१) उपरोक्त जमिन खाजगी वाटाघाटी व्दारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यांत घेण्यांत येणारे असल्याने सदर जमिनीचे मालकी हक्काबाबत काही बाद असल्यास, हिस्से वाटे इ.बाबत वाद, न्यायालयीन खटला चालु असल्यांस हया जाहिर प्रगटना पासुन ०७ दिवसांत उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी बुलडाणा यांचे कार्यालयांत शासकीय कामकाजांचे दिवसांत दु.०२-०० वा पावेतो लेखी आक्षेप कागदोपत्री पुराव्यासह तीन प्रतीत सादर करावेत.

०२) उपरोक्त नमूद ०१ नुसार विहित कालावधीत आलेला आक्षेपां बाबतच विचार करण्यांत येईल, विहित मुदती नंतर प्राप्त आक्षेपा बाबत विचार करण्यांत येणार नाही.

०३) सदर बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार हा संबंधित भूसंपादन अधिकारी यांचा राहिल.

०४) उपरोक्त प्रस्तावाची फक्त संयुक्त मोजणी हया जाहिर प्रगटना पासुन ०७ दिवस पावेतो उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी बुलडाणा यांचे कार्यालयीन वेळेत व दिवशी सकाळी ११-०० ते दुपारी ०२-०० पावेतो पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

दिांक.१३ /१२/२०१८.

उपविभागीय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी बुलडाणा.